Jan 17 2015 : MaharashtraTimes (Jalgaon)

# ‘महावितरण’ने बाजारातून पैसा उभारावा!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पर्याय

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

राज्यातील सरकारी वीजपुरवठा कंपनी, ‘महावितरण’ कर्ज, थकबाकीच्या ओझ्याखाली असून, तिला अर्थसाह्य करण्यासाठी राज्य सरकारला थेट मदत करावी लागते, वा कर्जासाठी हमी द्यावी लागते. पण, ही पद्धत कायम ठेवता येणार नाही. ‘महावितरण’ला खुल्या बाजारात रोखे वा समभाग विक्रीतून (इक्विटी) निधी उभा करावा लागेल, असा पर्याय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी ‘महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशनतर्फे (एमआयईडीए) आयोजित ‘महाराष्ट्र इकॉनॉमिक समिट’मध्ये सुचवला.

राज्याच्या औद्योगिक विकासात प्रचंड महाग वीज हा मोठा अडथळा ठरू लागल्याची वस्तुस्थिती समिटमध्ये मांडली गेली. त्यावर फडणवीस म्हणाले, ‘शेती क्षेत्राला काही हजार कोटींचे अनुदान दिले जाते. वीज केंद्रांना पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती करता येत नाहीत. त्यामुळे महावितरण आर्थिक दुरवस्थेत आहे. अशा स्थितीत स्वस्त विजेचा पुरवठा करणे शक्य होत नाही. त्याचा फटका औद्योगिक महाराष्ट्राला बसला आहे!’





> **महावितरणला खुल्या बाजारातून निधी मिळाल्यामुळे तिची आर्थिक स्थिती सुधारेल व वीज स्वस्तात देता येणे शक्य होईल. शिवाय, वीज क्षेत्रातही ‘पोर्टेबिलिटी’ लागू असल्याने आता ‘महावितरण’ऐवजी खासगी वीजनिर्मिती कंपन्यांकडूनही उद्योगांना ‘ओपन अॅक्सेस’च्या माध्यमातून वीजखरेदी करता येईल, ही वीज स्वस्ततही मिळेल. मात्र, त्यामुळे ‘महावितरण’चे नुकसान होणार असून, त्यातून मार्ग काढण्यासाठी कार्यक्षमता वाढवण्याशिवाय पर्याय नाही.**
>
> **- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

### ▶ सूचिबद्ध महावितरण?

रोखे वा समभाग विक्रीतून निधी उभा करायचा असेल, तर ‘महावितरण’ला शेअर बाजारांत सूचिबद्ध करावे लागेल. त्यानंतर, ‘सेबी’च्या परवानगीने आयपीओ वा अन्य पर्यायांचा वापर करून भांडवल गोळा करता येईल. मात्र, अशारितीने खुल्या बाजारातून निधी मिळवण्यासाठी ‘महावितरण’ला कार्यक्षमता सिद्ध करावी लागणार आहे, तरच कंपनीच्या ‘आयपीओ’ला गुंतवणूकदारांचा प्रतिसाद मिळू शकेल.

### महाग विजेमुळे उद्योग राज्याबाहेर

महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक विजेचे दर सर्वात महाग असल्याने छोटे व मध्यम स्वरूपाचे उद्योग शेजारच्या राज्यांमध्ये स्थलांतरित होऊ लागले आहे. दक्षिण महाराष्ट्रातील खूप उद्योग कर्नाटकात जात असल्याचे ‘एमआयईडीए’ संस्थापक-अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे यांनी निदर्शनास आणून दिले. महाराष्ट्रात औद्योगिक वीजदर प्रति युनिट ९.५० रुपये असून गुजरात, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेशमध्ये अनुक्रमे साडेपाच, चार आणि साडेपाच रुपये दराने उद्योगांना वीज मिळते. ही समस्या तातडीने सोडवायला हवी, असा मुद्दा साळुंखे यांनी उपस्थित केला.